# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०४/०७/२०२४ (गुरूवार) सकाळ**


---

## आषाढी एकादशी यात्रेनिमीत्त सावनेर अंतर्गत धापेवाडा बुजुर्ग येथे विठ्ठल रुक्मिणी मंदिर यात्रा स्थळाची पाहणी

पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत मौजा धापेवाडा बुजुर्ग येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिर येथे दिनांक ०३/०७/२०२४ रोजी १७.४५ वा. ते १८.४० वाजता पर्यंत आषाढी एकादशी निमीत्ताने मोठया प्रमाणात यात्रा भरणार असल्याने तसेच भाविकांची मोठया प्रमाणात गर्दी राहणार असल्याने यात्रा स्थळाची पाहणी मा. श्री अनिल म्हस्के सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर यांनी श्री रवींद्र मानकर पोलीस निरीक्षक सावनेर, श्री योगेश कामाले पोलीस निरीक्षक कळमेश्वर यांचे सह पाहणी केली. सदर ठिकाणी यात्रे संबंधित उपाययोजना करणे सुरू असल्याचे दिसून आले. योग्य नियोजन करण्याबाबत आयोजकांना मार्गदर्शन करण्यात आले.





---


पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर